**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत कलम १४३ नुसार पूर्वीचा रस्ता असेल तर दुसरा रस्ता देण्यापासून प्रतिबंध करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : विपआ-२०२६/प्र.क्र.६८(E १६२४३९६)/पाणंद रस्ते**
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० एप्रिल, २०२६.

**संदर्भ :** १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक : जमीन-२०५/प्र.क्र.४७/ज-१अ, दि.२२.०५.२०२५
२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३.

**प्रस्तावना :-**

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनामध्ये दि. १०.०७.२०२५ रोजी राज्यव्यापी सार्वत्रिक शेतजमीन मोजणी मोहिम राबविणे यासंबंधी मा. श्री. शिवाजीराव गर्जे व इतर विधानपरिषद सदस्य यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम, १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.८७ उपस्थित केली होती. त्यामध्ये मा. श्री. शशिकांत शिंदे, विधानपरिषद सदस्य यांनी "पूर्वीचा एखादा रस्ता योग्य पध्दतीने असेल तरी दुसरा रस्ता तयार करण्याचा प्रकार होतो. दुसरा रस्ता तयार करण्याची मागणी होते. ती मागणी अयोग्य असेल तर ती तत्काळ फेटाळली पाहिजे." असा मुद्दा उपस्थित केला होता. त्याअनुषंगाने मा. मंत्री (महसूल) यांनी पूर्वीचा रस्ता असेल तर दुसरा रस्ता देण्याची गरज नाही. या संदर्भात कडक आदेश देण्यात येतील, असे सभागृहाला आश्वासन दिले होते. सदर आश्वासनाच्या अनुषंगाने दुहेरी रस्त्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक** : -

राज्यात शेतजमिनीपर्यंत पोहोचण्यासाठी शेत रस्त्यांची आवश्यकता लक्षात घेता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ अंतर्गत रस्ते उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १४३ अंतर्गत रस्त्याचा हक्क देण्याचा मुख्य उद्देश म्हणजे संबंधित जमिनीला योग्य व वाजवी प्रवेश (reasonable access) उपलब्ध करून देणे हा आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, एखाद्याशेतक-याला त्याच्या शेतामध्ये जाण्याकरीता रस्ता अस्तित्वात असतानाही नव्याने दुसरा रस्ता मागण्याचे प्रकार होत आहेत. याअनुषंगाने जर शेतक-याला त्याच्या शेतजमिनीमध्ये जाण्यासाठी रस्ता असेल अशा परिस्थितीत नवीन

किंवा पर्यायी रस्ता कोणत्याही परिस्थितीत मंजूर करण्यात येवू नये. एखाद्या शेतक-याच्या केवळ अधिक सोयीसाठी, कमी अंतरासाठी किंवा वैयक्तिक फायद्यासाठी नवीन रस्ता मंजूर करू नये.

२. तहसीलदार यांनी शेत रस्त्याच्या मागणीच्या अनुषंगाने वस्तुस्थितीची प्रत्यक्ष स्थळ पाहणी (spot inspection) करुन शेतक-याला त्याच्या शेतामध्ये जाण्याकरीता पर्यायी रस्ता उपलब्ध असल्यास नवीन रस्ता मंजूर करु नये. दुहेरी रस्त्याबाबतच्या मागण्या तात्काळ फेटाळाव्यात.

३. या परिपत्रकातील सूचनांचे पालन न केल्यास संबंधित अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

४. मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ च्या कलम ५ नुसार करण्यात येणा-या कार्यवाहीला सदर परिपत्रकातील तरतूदी लागू नसतील.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२०१७५०३७८९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAPSINH MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf278360d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB3773059876920F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.04.20 17:51:30 +05'30'

**(प्रतापसिंह मच्छिंद्र खरात)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत.**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.
७. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, (ग्रामविकास) यांचे स्वीय सहाय्यक.
१२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. विभागीय आयुक्त (सर्व).
१४. जिल्हाधिकारी (सर्व).
१५. पोलिस अधीक्षक (सर्व).
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद (सर्व).